**उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेसाठी (इ. १२ वी ) अंध, अपंग, मूकबधिर, बहुविकलांग व अध्ययन अक्षमता असलेल्या विद्यार्थ्यांना जादा गुणांची सवलत देणेबाबत..**

**महाराष्ट्र शासन**

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,

शासन निर्णय, क्रमांक : कोर्ट-२००९/(३८/०९)/उमाशि-२,

मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.

दिनांक : २४ फेब्रुवारी, २०१०.

**वाचा:-** १) शासन निर्णय क्र. एसएससी १०९८/५७८७/(३१८/९८) /उमाशि-२, दि. ८ जुलै, १९९९.

२) शासन निर्णय क्र. एसएससी १०९९/(९९) /उमाशि-२, दि. २८ नोव्हेंबर, २०००.

३) महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे यांचे पत्र क्र. रा.मं./ परीक्षा-५/ २२१३, दि.२.४.२००९.

४) शासन पत्र समक्रमांक दि.१३ मे, २००९.

**प्रस्तावना :-**

अध्ययन अक्षमता असलेल्या इयत्ता १ ली ते इयत्ता १२ वी पर्यंतच्या शालेय विद्यार्थ्यांना तसेच उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेसाठी अंध, मूकबधीर बहुविकलांग व शारिरीकदृष्टया अपंग असलेल्या विद्यार्थ्यांप्रमाणे अध्ययन अक्षमता असलेल्या विद्यार्थ्यांना सवलती देण्याबाबत संदर्भाधीन शासन निर्णयांन्वये वेळोवेळी सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.

उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेस प्रविष्ठ होणा-या अध्ययन अक्षमता असलेल्या विद्यार्थ्यांना उत्तीर्णतेसाठी मंडळामार्फत देण्यात येणा-या गुणांच्या सवलतीबाबत सांप्रत इयत्ता १० वी तसेच विद्यापीठामध्ये देण्यात येत असलेल्या २० सवलत गुणांच्या धोरणानूसार इयत्ता १२ वी च्या विद्यार्थ्यांना गुण देण्याबाबत मा. उच्च न्यायालयात याचिका क्रमांक २१५१/२००८ दाखल केली होती. त्यावर मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार सदर विद्यार्थ्यांना जादा गुणांची सवलत देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेस प्रविष्ठ होणा-या अध्ययन अक्षमता असलेल्या विद्यार्थ्यांना उत्तीर्णतेसाठी मंडळामार्फत देण्यात येणा-या गुणांच्या सवलतीबाबत सांप्रत इयत्ता १० वी तसेच विद्यापीठामध्ये देण्यात येत असलेल्या २० सवलत गुणांच्या धारेणानुसार इयत्ता १२ वीच्या विद्यार्थ्यांना गुण देण्याबाबत मा. उच्च न्यायालयात उक्त याचिका दाखल केली होती. त्यावर मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार राज्यमंडळांतर्गत यासंदर्भात निर्णय घेण्यासाठी तज्ञांची समिती गठीत करण्यात आली होती. सदर तज्ञ समितीने केलेल्या शिफारशी विचारात घेवून त्या मंडळाच्या कार्यकारी परिषदेपुढे सादर करण्यात आल्या असता विद्यापीठ तसेच शालेयस्तरावर

सर्वसामान्य विद्यार्थ्यांना १० सवलतीचे गुण तर अध्ययन अक्षमता असलेल्या विद्यार्थ्यांना २० सवलतीचे गुण दिले जात असल्याने त्याप्रमाणेच इयत्ता १२ वीच्या अध्ययन अक्षमता असलेल्या विद्यार्थ्यांसाठी १५ ऐवजी २० सवलतीचे गुण दिले जावेत, प्रचलित पध्दतीनुसार हे गुण एकाच विषयामध्येही देण्यात यावेत, तसेच अध्ययन अक्षमता असलेल्या विद्यार्थ्यांबरोबर इतर अपंगत्व असलेले ; जसे कर्णबधिर, मूकबधिर, अंध, अपंग, बहुविकलांग अशा सर्वच विद्यार्थ्यांना ही सवलत देण्यात यावी, याची अमंलबजावणी फेब्रुवारी / मार्च, २००९ च्या परीक्षेपासून करावी असा प्रस्ताव राज्य मंडळाने सादर केला होता. सदर प्रस्तावास शासनाच्या संदर्भाधीन दि. १३ मे, २००९ च्या पत्रान्वये मान्यता देण्यात आली आहे. .

२. सदर तरतुदीचा अंतर्भाव महाराष्ट्र माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, अधिनियम १९६५ मधील कलम ३६ (३) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करुन महाराष्ट्र माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ विनियम १९७७ मधील पृष्ठ क्र. २११ वरील अनुक्रमांक ७ मध्ये दुरुस्ती करण्यासही याद्वारे शासनाची मान्यता देत आहे.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक क्रमांक २०१००२२४१७३७३४००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(सं.पु.खोरगडे)
**अवर सचिव,महाराष्ट्र शासन.**

**प्रति,**

अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, शिवाजी नगर, पुणे,
शिक्षण संचालक (माध्य.व उच्च माध्य.), महाराष्ट्र राज्य,पुणे,
सर्व विभागीय अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक विभागीय शिक्षण मंडळ,
संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे,
सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक,
महासंचालक, माहिती व जनसंपर्क, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
मा.प्रधान सचिव (उच्च व तंत्र शिक्षण विभाग), मंत्रालय, मुंबई-३२,
मा.मुख्यमंत्री यांचे उप सचिव, मा.मुख्यमंत्र्यांचे सचिवालय, मंत्रालय, मुंबई,
मा.उप मुख्यमंत्री यांचे उप सचिव, मंत्रालय, मुंबई,
मा.मंत्री (शालेय शिक्षण ) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
मा.राज्यमंत्री (शालेय शिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
मा.प्रधान सचिव (शालेय शिक्षण व क्रीडा विभाग), यांचे स्वीय सहायक मंत्रालय, मुंबई-३२,
निवड नस्ती (उमाशि-२).